**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

जावक क्रमांक:- २०३९/१८ दिनांक :- ०९ मे, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# म्हाडा कोंकण मंडळातर्फे ४६४० सदनिका व १४ भूखंड विक्रीसाठी १० मे रोजी संगणकीय सोडत

## मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सोडतीचे आयोजन

## पात्र अर्जदारांपैकी अनामत रकमेसह प्राप्त ४८,८०५ अर्जामधून निघणार सोडत

मुंबई, दि. ०९ मे, २०२३ :- म्हाडाच्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे ठाणे शहर-जिल्हा, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत उभारलेल्या ४६४० सदनिका व १४ भूखंडांच्या विक्रीकरिता अनामत रकमेसह प्राप्त ४८,८०५ अर्जाची संगणकीय सोडत बुधवार, दि. १० मे, २०२३ रोजी सकाळी १० वाजता ठाणे पश्चिम येथील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सदर सोडत काढली जाणार आहे. सदर सोडतीला उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री श्री. कपिल पाटील, ठाण्याचे पालकमंत्री श्री. शंभुराज देसाई, राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री श्री. रवींद्र चव्हाण आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत राहणार आहेत.

सोडतीत सहभाग घेतलेल्या अर्जदारांची संख्या लक्षात घेता मंडळातर्फे व्यापक सोयीचे नियोजन करण्यात आले आहे. अर्जदारांना निकाल पाहता यावा याकरिता नाट्यगृहाच्या आवारात देखील मंडप उभारण्यात आला आहे. नाट्यगृहात संगणकीय सोडतीचे थेट प्रक्षेपण पाहता यावे याकरिता एलईडी स्क्रीनही लावण्यात आले आहेत.

"वेबकास्टिंग" तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडतीच्या कार्यक्रमाचे घरबसल्या थेट प्रक्षेपण बघण्याची सुविधाही bit.ly/konkan_mhada या लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सोडतीचे थेट प्रक्षेपण वेबकास्टिंगद्वारे करण्यात येणार असल्याने नागरिकांना

अल्पावधीतच सोडतीचा निकाल जाणून घेता येणार आहे. सोडतीमधील विजेत्या अर्जदारांची यादी म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या वेबसाईटवर दि. १० मे, २०२३ रोजी रोजी सायंकाळी ६.०० वाजता प्रसिद्ध केली जाणार असून विजेत्या अर्जदारांना एसएमएसद्वारेही विजेता ठरल्याबाबतची माहिती कळविली जाणार आहे. सोडतीत विजेता ठरल्यानंतर सूचना पत्र पाठविले जाणार असून त्यातील तरतुदींची पूर्तता केल्यानंतर विजेत्या अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र पाठविले जाणार आहे.

सदर सोडत नवीन संगणकीय प्रणाली IHLMS 2.0 (Integrated Housing Lottery Management System) द्वारे होत आहे. या सोडतीत अत्यल्प, अल्प, मध्यम उत्पन्न गटाकरिता सदनिकांचा समावेश आहे.

दि. ०६ मार्च, २०२३ रोजी सोडतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. दि. ०८ मार्च, २०२३ ते दि. १९ एप्रिल, २०२३ या कालावधीत अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात आले.

अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी सोडतीत प्रधानमंत्री आवासयोजनेअंतर्गत खोणी-कल्याण, शिरढोण, विरार-बोळिंज वगोठेघर येथील योजनेतील एकूण ९८४ सदनिकांचा समावेश करण्यात आहे. या योजनेला केंद्र शासनाची मंजुरी असून योजनेमधील सर्व सदनिकांना केंद्र शासनाचे १.५० लाख व राज्य शासनाचे ०१.०० लाख अनुदान मिळणार आहे. या योजनेत अनामत रकमेसह ३५२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

२० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत एकूण १४५६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध असून अनामत रकमेसह ४६१२१ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना ०१ टक्के रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून कोंकण मंडळास भरणा करावयाचा असून उर्वरित रकमेचा भरणा विकासाकडे करावयाचा आहे.

म्हाडा योजनेमध्ये कोंकण मंडळाद्वारे बांधलेल्या सदनिका व भूखंड यांचा समावेश असून यायोजनेमध्ये सोडतीत १६६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध असून अनामत रकमेसह २४४६ अर्जप्राप्त झाले आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विरार बोळिंज येथील २०४८ सदनिकांचा समावेश असून अनामत रकमेसह ३६९ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेत प्रथम अर्ज करण्यास प्रथम प्राधान्याने सदनिका वितरित केली जाणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण